# *गोष्ट दमलेल्या बाबाची......*

*डॉ बालाजी आसेगावकर*
*स्नेहसावली केअर सेंटर, औरंगाबाद*

मी रोज स्नेहसावलीमध्ये पोरे काकांना भेटायचो तेव्हा त्यांचा एकच प्रश्न असायचा माझ्या मुलाचा फोन आला का? पोरेकाकांना दीड वर्षांपूर्वी त्यांचा मुलगा आमच्याकडे भरती करून गेला होता. त्यावेळी त्यांना नुकताच अर्धांगवायूचा झटका येऊन गेल्यामुळे ते पूर्णतः परावलंबी झाले होते. त्यांचे वय ७० वर्षे होते. भौतिकउपचार व औषधगोळ्यांनी बऱ्यापैकी आता ते काठीच्या आधाराने चालत. बाकी तसे ते ठणठणीत होते. पण मी जेव्हा जेव्हा त्यांना भेटायचो ते मला हमखास त्यांच्या मुलाचा फोन आला का हे विचारायचे. मी पण ठासून त्यांना सांगायचो हो तो दर एक दोन दिवसांनी नियमित तो फोन करतो बरं का. फार काळजी आहे त्याला तुमची, फक्त म्हणाला सध्या काही दिवस येऊ शकत नाही. प्रत्यक्षात मात्र त्यांच्या मुलाने मला कधीही फोन केला नव्हता. आम्ही आमच्याकडे राहत असलेल्या प्रत्येकाच्या नातेवाईकाला दर आठवड्यात फोनवर संपर्क साधून माहिती देत असतो. पोरेकाकांच्या मुलाला फोन केला की स्नेहसावलीचा नंबर बघूनच तो फोन उचलायचा नाही. मग दुसऱ्या नंबरवरून फोन केला तर उचलायचा पण त्याला त्यांच्याबद्दल, त्यांच्या तब्येतीबद्दल ऐकण्यात काहीच स्वारस्य नसायचे. बाकी पोरे काकांना कोणी नातेवाईक नसल्याने त्यांच्या मानसिक स्वास्थ्यासाठी मलाच रोज मुलाचा फोन आला असे खोटे सांगावे लागायचे.

एकदा योगायोगाने मी एका लग्नाला गेलो आणि तिथे मला पोरेकाकांचा हा मुलगा भेटला. मलाही खूप उत्सुकता होती की हा वडिलांची जराही विचारपूस का करीत नाही ?

मी सरळ त्याला हा प्रश्न विचारला......त्यावर प्रथम तर त्याने दीर्घ उसासा सोडला व म्हणाला काय सांगू डॉक्टर, माझ्या वडिलाने फक्त बाप होण्याचे कर्तव्य पार पडले आहे. मला शिकवले, नौकरी लावून दिली पण बापाचे प्रेम कधीच दिले नाही. मला आई नव्हती अन ह्यांना वेळ नव्हता. हे फक्त पैशाच्याच मागे होते. मला एकदाही आठवत नाही की कधी ते माझ्यासोबत बोलले, खेळले असतील. मला लहानपणापासूनच दूर होस्टेलवर

ठेवले आणि दर महिन्याला पैसे पाठवायचे. त्यांनी कधी माझी विचारपूस देखील नाही केली ना कधी फोनवर बोलले वा भेटायला आले. आज मीही तेच करीत आहे. आज मी एवढ्या मोठ्या पदावर आहे ते केवळ स्वतःच्या कष्टाच्या जोरावर.....मी त्यावर त्याला म्हणालो तूझ सगळं बरोबर आहे पण आईवडिलांच्या नात्यात तरी ही देवाणघेवाणीची वा जशास तसे वागण्याची रीत बरोबर नाहीय. ते तुझ्या दृष्टीने चुकले म्हणून तू त्यांना असे वागवू नये. उलट मोठ्या मनाने तुम्ही दोघांनी एकमेकांना समजावून घेतले पाहिजे. बऱ्याचदा काही जणांचे प्रेम हे अव्यक्त असते. त्याचा अर्थ ह्यांनी माझ्यावर प्रेमच केलं नाही असा का काढावा? तुला पोरे काकांनी दूर राहून का होईना चांगले शिक्षण दिले, दुसरे लग्न केले नाही, सतत तुझ्या प्रगतीचा विचार करत जगले हे त्यांचे प्रेम नाही का? ते रोज तुझी आठवण करतात.मी नक्की सांगू शकतो कि त्यांचे तुझ्यावर अतोनात प्रेम आहे. तू त्यांना भेटू नकोस पण कमीत कमी फोनवर तरी संवाद साधत राहा. अरे हे जग खूप मोठे आहे पण आपण आपले मन का इतके छोटे करायचे? सर्वात आधी तर आपल्या लोकांच्या चूका माफ करायला शिकले पाहिजे. किती दिवस आपण आपल्याच लोकांना शत्रू सारखे वागवायचे. तू ही नकळत त्यांचाच विचार करत असणार. एकदा त्यांना माफ करून तर बघ. निखळ प्रेम तुझी वाट बघत आहे आणि इथेच आमचा संवाद संपला.

मी दुसऱ्या दिवशी स्नेह सावलीत गेलो तर पोरेकाका मला भेटण्यासाठी दारातच थांबले होते. मी गेल्या गेल्या " डॉक्टर तुमच्यामुळे माझा मुलगा भेटला हो मला. आज चक्क त्याचा फोन आला होता. स्वतः बोलला की हो तो माझ्याशी..." असे म्हणत त्यांच्या डोळ्यातून अश्रूंचा वर्षाव होत होता आणि ते चक्क माझ्या गळ्यात पडून एखाद्या लहान मुलासारखे रडत होते अन् त्यांचा तो आनंद पाहून मी मनोमन सुखावत होतो...